आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२४ फेब्रुवारी २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशातल्या नागरिकांना सुदृढ ठेवण्यासाठी खासगी क्षेत्रानंही सहकार्य करावं, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- चालू आर्थिक वर्षासाठी ११ हजार ९५५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या विधानसभेत सादर

- गोंदिया-जबलपूर रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणासह ३ रेल्वे प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार ६९ अंकांची घसरण

**<><><><><>**

देशातल्या नागरिकांचं आरोग्य ही सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांना सुदृढ ठेवण्यासाठी खासगी क्षेत्रानंही सहकार्य करावं, अशी गरज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केली. त्या आज मुंबईत लोकभवनात 'जीवरक्षण आणि तंदुरुस्त भारताची निर्मिती' या देशव्यापी मोहिमेचं उद्घाटन करताना बोलत होत्या. मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष न करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**- - होल्ड राष्ट्रपती बाइट - -**

देशाला मोठ्या प्रमाणात औषधं आणि उपकरणं आयात करावी लागत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. हे अवलंबित्व कमी करण्यासाठी आरोग्य आणि उद्योग क्षेत्रानं योगदान द्यावं असं आवाहन त्यांनी केलं.

यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

देशभरातल्या ७५ जिल्ह्यांमध्ये चालणाऱ्या या मोहिमेच्या अंतर्गत नागरिकांची विविध आरोग्य तपासणी केली जाणार आहे. तसंच नागरिकांमध्ये आरोग्याच्या विविध समस्यांविषयी जनजागृती केली जाणार असल्याचं रुग्णालयाचे अध्यक्ष ए. पी. हिंदुजा म्हणाले.

राष्ट्रपती उद्या शेगाव इथं केंद्रीय आयुष मंत्रालयानं आयोजित केलेल्या राष्ट्रीय आरोग्य मेळ्याला, तसंच नागपूरमध्ये आयोजित 'एकता आणि विश्वासातून महाराष्ट्राचं सुवर्णयुग' उपक्रमाच्या उद्घाटन समारंभालाही त्या उपस्थित राहणार आहेत.

**<><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत ११ हजार ९५५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. महसुली तूट भरून काढण्यासाठी पुरवणी मागण्या कमी ठेवल्या आहेत. कृषी पंप आणि यंत्रमागावरल्या अनुदानासाठी ३ हजार ११२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी ८०३ कोटी प्रस्तावित आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये राज्यावर ९ कोटी ३२ लाख रुपये कर्जाचा बोजा वाढण्याचा अंदाज यात वर्तवला आहे.

**<><><><>**

अमली पदार्थांबाबत शून्य सहिष्णुता हे सरकारचं धोरण आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. अमली पदार्थांची तस्करी करण्याचे वेगवेगळे मार्ग शोधले जात आहेत, कुरिअरद्वारे अमली पदार्थ पाठवले जात असल्याचं आढळून आलं असून अशा कुरिअरवर कारवाई केली जाईल, अमली पदार्थ विक्रीत दोषी ठरलेल्या पोलिसांना बडतर्फ केलं जात आहे असंही त्यांनी सांगितलं…..

- **- होल्ड - बाईट फडनवीस - -**

नियमांचं वारंवार उल्लंघन करणाऱ्या, राज्यातल्या ऑर्केस्ट्रा बारचे परवाने कायमचे रद्द केले जातील, यासाठी सुधारणा विधेयक या अधिवेशनात किंवा पुढच्या अधिवेशनात आणलं जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

राज्यातल्या एकूण ४७९ धर्मादाय रुग्णालयांपैकी केवळ १३४ रुग्णालयं सध्या आयुष्यमान भारत आणि महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना एकत्रितपणे राबवत आहेत. त्यामुळे राज्य सरकारनं आता कायद्यात बदल केला असून यापुढं सर्व पात्र रुग्णालयांना या योजना राबवणं बंधनकारक असेल. टाळाटाळ करणाऱ्या रुग्णालयांवर कायद्यानुसार सुनावणी घेऊन कडक कारवाई केली जाईल, असं आश्वासनही त्यांनी दिलं.

**<><><><>**

विधानसभेत आज राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या आभार प्रस्तावावर चर्चा सुरु झाली. सरकार केवळ भुलथापा देऊन आकर्षक घोषणा करून लोकांची फसवणूक करत आहे अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी या चर्चेत सहभागी होताना केली. राज्यात रोजगार निर्मिती होत नाही, सरकारी नोकऱ्यांचं कंत्राटीकरण केलं जात आहे, बेरोजगारीनं उच्चांक गाठला आहे, मात्र सरकार लोकांना केवळ झुलवत ठेवत आहे, असं ते म्हणाले.

दावोस दौऱ्यात तीस लाख कोटींची गुंतवणूक राज्यात आली, गुंतवणूकीच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशातलं पहिल्या क्रमांकाचं राज्य असल्याचं भाजपा आमदार संजय कुटे म्हणाले.

मराठवाड्यात सिंचनाच्या योजना रखडल्या आहेत, त्या पूर्ण करण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी द्यावं अशी मागणी शिवसेना आमदार अर्जुन खोतकर यांनी केली. चेतन तुपे यांनीही चर्चेत भाग घेतला.

**<><><><><>**

अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या कोकणातल्या बागांचे पंचनामे करून आंबा बागायतदारांना योग्य नुकसान भरपाई देऊ, असं आश्वासन फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी विधान परिषदेत एका लक्षवेधी सूचनेवर दिलं. त्यानंतर राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरू झाली. प्रवीण दरेकर यांनी या चर्चेला सुरुवात केली.

**<><><><><>**

गोंदिया-जबलपूर रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणासह रेल्वेच्या ३ प्रकल्पांना आज केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत मंत्रिमंडळ बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. या ३ प्रकल्पांवर एकूण ९ हजार ७२ कोटी रुपये खर्च होणार आहे.

नवी दिल्लीत नव्यानं उभारण्यात आलेल्या सेवा तीर्थ संकुलात आज प्रथमच केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. केरळ राज्याचं नाव ‘केरलम्’ असं करण्याच्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण झालेल्या धास्तीचे पडसाद आजही भारतीय शेअर बाजारांमध्ये उमटले. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार ६९

अंकांची घसरण झाली आणि तो ८२ हजार २२६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २८८ अंकांनी घसरून २५ हजार ४२५ अंकांवर बंद झाला.

परकीय चलन बाजारात आज भारतीय रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेने ७ पैशांनी घसरून ९० रुपये आणि ९५ पैशांवर बंद झाला.

<><><><><>

चालू हंगामात कापूस खरेदीला मुदतवाढ देण्याची मागणी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. अतिवृष्टीमुळे कापूस काढणीला अनेक ठिकाणी उशीर होत असून, राज्यातला कोणताही कापूस उत्पादक शेतकरी किमान आधारभूत किंमतीपासून वंचित राहू नये, यासाठी, २७ फेब्रुवारीला संपत असलेली ही मुदत येत्या ३१ मार्च वाढवावी, असं मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. भारतीय कापूस महामंडळाचे अध्यक्ष ललितकुमार गुप्ता यांच्याकडेही मुनगंटीवार यांनी ही मागणी पत्र लिहून केली आहे.

<><><><><>

भारतीय जनता पक्षाची नवी राज्य कार्यकारिणी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज जाहीर केली. यामध्ये उपाध्यक्षपदी ११ जणांची तर प्रदेश महासचिवपदी ६ जणांची नियुक्ती झाली आहे. दहा जणांची प्रदेश सचिव म्हणून नेमणूक झाली आहे. आर्थिक प्रदेश कोषाध्यक्षपदी मिहिर कोटेचा तर सहकोषाध्यक्ष पदाची जबाबदारी अरुण लाखानी यांच्याकडे दिली आहे. नवनाथ बन यांच्याकडे राज्याचे मुख्य प्रवक्तेपद सोपवलं आहे.

दरम्यान, भाजपचं देशव्यापी प्रशिक्षण महाअभियान आजपासून मुंबईत सुरू होत आहे.

<><><><><>

राज्य सरकारनं सरकारी कर्मचाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानासाठीचं सेवाशुल्क दुप्पट करण्याचा निर्णय घेतला आहे. २२० रुपये ते ९३० रुपयांच्या दरम्यान सरकारनं हे सेवाशुल्क निश्चित केलं आहे. राज्यभर हे दर एकसमान असतील. राज्य सरकारच्या सेवेतल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनश्रेणीनुसार हे सेवाशुल्क द्यावं लागेल. १ फेब्रुवारी २०२३ पासून हे दर लागू होणार असून गेल्या ३ वर्षातली थकबाकी ३ हप्त्यांमध्ये वसूल केली जाणार आहे.

<><><><><>

नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकानं काल एका कारवाईत सुमारे १ कोटी २ लाख रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त केले. तळोजा घोट कँप इथं केलेल्या कारवाईत दोन जणांना अटक झाली असून तिसऱ्या आरोपीचा शोध सुरु आहे.

**<><><><><>**

**टी-ट्वेंटी क्रिकेट** विश्वचषक स्पर्धेत सुपर एट गटात आज श्रीलंकेत पल्लिकल इथं इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यात सामना होत आहे. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी कर्नाटक आणि जम्मू काश्मीर यांच्यात अंतिम सामना आज कर्नाटकात हुबळी इथं सुरु झाला. प्रथमच अंतिम फेरीत पोहोचलेल्या जम्मू-काश्मीरनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि आज दिवसअखेरपर्यंत २ बाद २८४ धावा केल्या. शुभम पुंदीरनं नाबाद शतकं केलं. आजचा खेळ थांबला तेव्हा तो ११७, तर अब्दुल समद ५२ धावांवर खेळत होता.

महिला क्रिकेटमधे भारत-ऑस्ट्रेलिया एकदिवसीय मालिकेत आज ऑस्ट्रेलियात ब्रिस्बेन इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारताला पराभव पत्करावा लागला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताचा डाव ४९ व्या षटकात २१४ धावांवर संपला. ऑस्ट्रेलियानं ही धावसंख्या ४ गडी गमावून ३९ व्या षटकातच पार केली.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची तसंच तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान कोरडं राहील.

**//<><><><><>//**